**परिवहन विभागाच्या सेवा शुल्काचे ग्रास (GRAS) प्रणालीसोबत एकत्रिकरण झाल्यानंतर, वित्तीय महसूल संकलन आणि देयकांच्या अदायगीसाठी मंजुरी देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## परिवहन विभाग

**शासन निर्णय क्रमांक: एमव्हीडी-०१२६/प्र.क्र.२४४/परि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ जुलै, २०२६

**वाचा:** १) वित्त विभागाचे अर्धशासकीय पत्र क्रमांक: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४५/कोषा प्रशा-४, दिनांक ०६/०५/२०२६.

२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४५/कोषा प्रशा-४, दिनांक २१/०५/२०२६.

३) गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्रमांक: एच.डी.-५००१०/१/२०२६-का/का उप सचिव (परिवहन)-एमएमएचडी, दिनांक २६/०५/२०२६.

४) परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. पअका/डी-९/ग्रास लेखाशीर्ष/२०२६-२७/जा.क्र.७९०५ दिनांक: १४.०७.२०२६

**प्रस्तावना:**

व्हिजन महाराष्ट्र २०४७ अंतर्गत परिवहन विभागाच्या सर्व सेवा शुल्काचे शासकीय ग्रास (GRAS - Government Receipt Accounting System) प्रणालीसोबत तांत्रिक एकत्रीकरण (Integration) करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या नवीन प्रणालीमध्ये गोळा होणारा महसूल थेट शासकीय तिजोरीत जमा होणार असल्याने, बाह्य कंत्राटदारांचे शुल्क (Vendor Fees) आणि टपाल खर्च (Postal Charges) थेट वजा न करता शासकीय महसूल खात्यातून स्वतंत्रपणे अदा करण्यासाठी परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

परिवहन विभागाच्या सेवा शुल्काचे ग्रास (GRAS) प्रणालीसोबत एकत्रीकरण झाल्यानंतर, वित्तीय महसूल संकलन आणि देयकांच्या/खर्चाच्या अदायगीसाठी खालील कार्यपद्धतीस याद्वारे मंजुरी प्रदान करण्यात येत आहे:-

१. प्रस्तावित नवीन ग्रास (GRAS) प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर, जमा होणाऱ्या एकूण महसुलातून कोणत्याही बाह्य कंत्राटदाराचे/व्हेंडरचे शुल्क (Vendor Fees) किंवा टपाल खर्च (Postal Charges) थेट (At Source) वजा केला जाणार नाही.

२. गोळा होणारा महसूल सर्वप्रथम संपूर्णपणे शासकीय खात्यात (Government Exchequer) जमा केला जाईल.

३. त्यानंतर, परिवहन विभागामार्फत सदर व्हेंडर फी आणि टपाल खर्चाची देयके स्वतंत्रपणे तयार केली जातील आणि आरबीआयच्या (RBI) मार्गदर्शक सूत्रांनुसार व वित्तीय नियमांनुसार याबाबतचे प्रदान संबंधितांना धनादेशाव्दारे (Cheque) किंवा ई-पेमेंट (e-payment) माध्यमातून स्वतंत्रपणे अदा केली जातील.

४. सदर प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित होत असताना, व्हेंडर फी (Vendor Fee) आणि टपाल शुल्क (Postal Charges) यांच्या रकमा शासकीय महसूल खाते क्र. ६१०३००३०३६ खात्यातून अदा (draw) करण्याबाबतची आवश्यक ती परवानगी याद्वारे देण्यात येत आहे.

५. सदर खात्यातून रक्कम आहरित करण्याकरिता उपआयुक्त लेखा, परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

परिवहन आयुक्त कार्यालयाने सदर निधी शासकीय खात्यातून काढताना (Draw करताना) वित्त विभागाच्या प्रचलित वित्तीय नियमांचे व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे. या अदायगीचे स्वतंत्र व नियमित लेखापरीक्षण (Audit) करून घेणे बंधनकारक राहील.

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२२१७३९०८८६३९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SAGAR DHONDIRAM PATIL
Date: 2026.07.22 17:39:59 +05'30'

**(सागर धों.पाटील)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उप मुख्यमंत्री, (न.वि.वि.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु) (क्रीडा व युवक कल्याण) आणि (अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) मा.अपर मुख्य सचिव, (परिवहन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

९) मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) मा.परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
११) सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालये.
१२) निवड नस्ती (परि-३).